(४४७)

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
काकडे बीझ आयकॉन, चौथा मजला, ई-स्क्वेअर जवळ,
पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर, शिवाजी नगर, पुणे -४११०१६.
**दूरध्वनी क्रमांक:** (का.) : ०२०-२५५७७१११, २५५७७९००
**ई-मेल:** srapune@yahoo.in **वेबसाईट:** www.srapune.gov.in

स्वराज्य श्रीराज्याभिषेक शके ३५०
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.झोपुप्रा/कायदा/१०५६/२०२३
दिनांक:-११/०९/२०२३
१५/०९/२०२३

परिपत्रक क्र. ०८ /२०२३

विषय झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे विकसक आणि सशुल्क पात्र ठरलेल्या झोपडीधारकांमधील करारनाम्याचा मसुदा निष्पादनाबाबत...

संदर्भ : १. गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. झोपुधो-०८१०/प्र.क्र.९६/ २०१८/झोपसु-१, दि. १६/०५/२०१८.
२. गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र. ५४(भाग-१) झोपसु-१, २५/०५/२०२३.
३. गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. झोपुधो ०८१०/प्र.क्र.९६/ २०१८/झोपसु-१, दि.१४/०८/२०२३.

महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडील अधिसुचना क्र. झोपुप्रा२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३० जुन २००५ अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३अ नुसार पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत दि.०१/०१/२००० पासून दि.०१/०१/२०११ पर्यंत अस्तित्वात असलेल्या झोपडीच्या संदर्भात अशा झोपडीत प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीधारकांचे सशुल्क पुनर्वसन करण्याचे धोरण शासनाने दि.१६/०५/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्विकारले आहे, तसेच दि.२५/०५/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत सशुल्क पुनर्वसन सदनिकेचे शुल्क २.५ लाख निश्चित करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर दि.१६/०५/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील काही तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आल्या असून काही तरतुदींचा नव्याने समावेश करणेकामी दि.१४/०८/२०२३ रोजीचे शासन निर्णय अंमलात आणण्यात आले आहे.

उपरोक्त शासन निर्णयातील नमूद सर्व अटी व शर्तींचा समावेश करण्यात येऊन या प्राधिकरणामार्फत सशुल्क पात्र लाभार्थींच्या नावे नोंदणीकृत करण्यात येणाऱ्या सदनिकेचा करारनामा निश्चित करण्यात आला आहे. त्यास अनुसरून या प्राधिकरणाकडील नोंदणीकृत विकसकांनी या कार्यालयामार्फत विहित केलेल्या करारनाम्याच्या मसुद्याप्रमाणे सशुल्क पात्र लाभार्थीच्या नावे सदनिकेचा करारनामा नोंदणीकृत करणे अनिवार्य राहिल.

उपरोक्त आदेश तात्काळ अंमलात येतील.

**(नीलेश र. गटणे,** भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

प्रत/- तात्काळ अंमलबजावणी साठी

१. सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी
२. सर्व नोंदणीकृत विकसक.

4445

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे विकसक आणि सशुल्क पात्र ठरलेले झोपडीधारक यांचेमधील सदनिकेचा करारनामा

आज दिनांक ______________ माहे ____________ इसवी सन २०२३ दिवशी पिंपरी, पुणे मुक्कामी खालीलप्रमाणे करारनामा करण्यात येत आहे व तो नोंदणीकृत करण्यात येत आहे.

१. नाव:

वय : सज्ञान, व्यवसाय: व्यवसाय /नोकरी/ घरकाम

२. नाव:

वय : सज्ञान , व्यवसाय : व्यवसाय /गृहिणी / घरकाम

दोघे राहणार - ________________________________________________

(यापुढे प्रस्तुत करारामध्ये ज्यांचा उल्लेख **पात्र झोपडीधारक/ लिहून घेणार/ पात्र लाभार्थी** असा केलेला आहे, व त्या संज्ञेमध्ये त्यांचेशिवाय, त्यांचे वारस, नॉमिनी, असायनीज, व्यवस्थापक, प्रशासक, कुलमुखत्यार इत्यादींचा समावेश होतो.)

आणि

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेकडील नोंदणीकृत विकसक** ---------------------- तर्फे भागीदार / अधिकृत स्वाक्षरी कर्ता - ---------------------- वय : ---- वर्ष धंदा : --------- , रा: -------------------------.

(यापुढे प्रस्तुत करारनामा ज्यांचा उल्लेख **लिहून देणार/ विकसक** असा करण्यात आलेला आहे, व ज्या संज्ञेमध्ये त्यांचेशिवाय, त्यांचे वारस, नॉमिनी, असायनीज, व्यवस्थापक, प्रशासक, कुलमुखत्यार इत्यादींचा समावेश होतो.)

A. ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड पुणे महानगरपालिका हद्दीमधील मौजे ----------- येथील ------ ---------------------- येथील एकूण क्षेत्रफळ ----------- चौ.मी. जमीन मिळकत ज्याचा उल्लेख सविस्तरपणे -**परिशिष्ट अ** मध्ये नमूद केलेला आहे व **यापुढे सदर मिळकत**

असा उल्लेख केलेला आहे. सदर जमीन मिळकत ------------------ यांचे मालकीची आहे. आणि,

B. ज्याअर्थी, सदरील जमीन मिळकतीवर झोपडपट्टी निर्माण झाली व तेथील नागरिकांना योग्य त्या मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध नसल्याने तसेच स्वच्छतेचा अभाव असल्याने व सदर मिळकतीमध्ये पाणी, वीज, ड्रेनेज यांच्या सुविधा नसल्याने मा. ------------------------ यांनी सदरील मिळकत झोपडपट्टी सदृश असल्याबाबत दि. ------------- रोजी झोपडपट्टी सदृश अहवाल दिलेला आहे. आणि,

C. ज्याअर्थी, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची अंमलबजावणी करणेकामी पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका या क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(अ) नुसार महाराष्ट्र शासन अधिसूचना झोपूयो २००४/प्र. क्र. २१३ /झोपासू ०१ अन्वये दि. ३०/०६/२००५ रोजी करण्यात आलेली असून लिहून देणार यांनी सर्वप्रथम सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने झोपडीधारकांची संमती घेऊन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडे दि. --------- रोजी प्रस्ताव दाखल केलेला आहे. आणि,

D. ज्याअर्थी, सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवणेकामी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी उक्त अधिनियमाच्या कलम ३ (क) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन आदेश क्र. -------------------, दि.----------- रोजी पारित केलेला आहे. आणि,

E. ज्याअर्थी, सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी सदर झोपडपट्टीचे सर्वेक्षण करून झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेली असून त्या अनुषंगाने अंतिम पात्रता यादी परिशिष्ट क्रमांक --- मध्ये दि.----------- रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. आणि,

F. ज्याअर्थी, कलम ३(ड) सह कलम १२ अन्वये झोपडपट्टी निर्मूलन आदेश क्रमांक ------------------, दि.------------ रोजी निर्गमित केलेला आहे. आणि,

G. ज्याअर्थी, परिशिष्ट -अ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही -------------------- यांच्या मालकीची असल्याने झोपुप्रा नियमावली, २०१४ मधील तरतूद क्र. एस आर. १२ नुसार शासकीय जमिनीचे वार्षिक बाजारमूल्य तक्त्याप्रमाणे अधिमुल्य ठरवून सदर अधिमुल्याच्या २५% अधिमुल्य रक्कम रू. ------------- लिहुन देणार/विकसक यांनी दि. -------- रोजीच्या चलनाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचेकडे जमा केलेली आहे. आणि,

H. ज्याअर्थी, सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी सन २०१४ रोजीच्या विशेष नियमावलीचे नियम एस.आर. ४ (५) अन्वये दि. ------ रोजी मंजुरी देण्यात आलेली असून, त्या अनुषंगाने

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडून बांधकाम चालू करण्यासाठीचा दाखला -------------------- अन्वये दि.---------- रोजी देण्यात आलेला आहे व विकसकास बांधकाम नकाशे मंजूर करून बांधकामाची परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानंतर सुधारित बांधकाम परवानगी दि. --------------- रोजी देण्यात आलेली आहे. आणि,

I. ज्याअर्थी, सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या पुनर्वसन इमारत --- (पुनर्वसन घटक अधिक विक्री घटक) संदर्भात ------- चौ.मी. जागेपैकी -------- चौरस मीटर क्षेत्र विचारात घेण्यात आलेले आहे व त्या प्रमाणे बांधकामाची परवानगी देण्यात आलेली आहे. सदर पुनर्वसन ---- इमारत सोडून उर्वरित जमिनीवर लिहून देणार हे -------- येथील झोपडीधारकांसाठी पुनर्वसन सदनिका घटक अधिक विक्री घटक, समाविष्ट असलेली ईमारत बांधत असून त्यास पुनर्वसन --- इमारत संबोधण्यात आलेले असून सदरबाबतीत लिहून घेणार हे भविष्यामध्ये कोणतीही हिल्ला हरकत घेता येणार नाही. तसेच लिहून देणार हे सदर संपूर्ण जमीन मिळकत अथवा सदर पुनर्वसन इमारतीची जमीन मिळकत अथवा मुक्त विक्री घटकातील जमीन मिळकत अथवा या सर्व अथवा यापैकी कोणत्याही जमीन मिळकतीची वेगळी विभागणी/उपविभागणी करता/ न करता नवीन मालमत्ता पत्रक योग्य त्या शासकीय कार्यालयाकडून तयार करून घेणार आहेत. यासाठी लिहून घेणार व त्यांचे सहकारी गृहनिर्माण संस्थेची कसलीही हरकत, फिर्याद इत्यादी असणार नाही व त्यासाठी या दस्ताद्वारे लिहून देणार यांनी लिहून घेणार यांस सर्वप्रकारच्या संमत्या विनामोबदला व विना अट दिलेल्या आहेत. आणि,

J. ज्याअर्थी, विकसक यांनी इमारतीचे बांधकाम पूर्ण करून दिनांक ------- रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या कार्यालयाकडून जा. क्र. -------------- अन्वये पुनर्वसन घटक अधिक विक्री घटक या (पुनर्वसन --- इमारत) इमारतीचे अंशतः भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. आणि,

K. ज्याअर्थी, सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या पुनर्वसन इमारतीमधील काही सदनिका अथवा दुकान हे मुक्त विक्री घटकातील असून (त्यांचा सविस्तर उल्लेख भोगवटा प्रमाणपत्र व मंजूर नकाशांमध्ये केलेला आहे), सदर मुक्त विक्री घटकातील सदनिका अथवा दुकान हे लिहून देणार हे त्यांच्या मर्जीप्रमाणे कोणासही विक्री, गहाण, तबदील, दान, लीज इत्यादी प्रकारे त्याचा विनियोग करू शकतात व त्यासाठी लिहून घेणार अथवा लिहून घेणार यांनी स्थापन केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेची कोणतेही व कसलीही परवानगी अथवा नाहरकत दाखला इत्यादीची जरुरी नाही. तसेच लिहून घेणार यांनी स्थापन केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेने पुनर्वसन ईमारतीमधील (पुनर्वसन घटक अधिक विक्री घटक) मुक्त विक्री घटकातील सदनिका अथवा दुकानदारांना सहकारी गृहनिर्माण संस्थेने सभासद करणे बंधनकारक आहे. लिहून घेणार यांची सहकारी

गृहनिर्माण संस्था ही लिहून देणार यांचेमार्फत विक्री (फर्स्ट सेल) करत असलेल्या मुक्त विक्री घटकातील सदनिका अथवा दुकानदारांकडून कोणतेही व कसलेही सोसायटी सभासद हस्तांतरण शुल्क घेणार नाहीत. आणि,

L. ज्याअर्थी, सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या पुनर्वसन इमारती (पुनर्वसन घटक अधिक विक्री घटक) मध्ये मंजूर नकाशांप्रमाणे पार्किंग, सोसायटी ऑफिस, प्रसाधन गृह, स्टोअर रूम इत्यादी सोयीसुविधा दिलेल्या असून त्यांचा वापर हा पुनर्वसन घटक व मुक्त विक्री घटक यांचे सामायिक वापराकरिता असणार आहे. आणि,

M. ज्याअर्थी, मुक्त विक्री घटकासाठी जल-मलनिस्सारण वाहिनी (ड्रेनेज), पाणीपुरवठा वाहिनी, वीजवाहिनी इत्यादी सामायिक वापराच्या बाबी या पुनर्वसन इमारतीच्या जमिनीमधून मुख्य ठिकाणी जोडल्या गेलेल्या आहेत व भविष्यात काही सामायिक देखभाल दुरुस्ती करायची लागल्यास, लिहून घेणार व त्यांची सहकारी गृहनिर्माण संस्था याबद्दल कोणताही वाद-विवाद, फिर्याद, आक्षेप घेणार नाहीत व त्यासाठी कुठलाही व कोणत्याही स्वरूपात मोबदला मागणार नाहीत तसेच आवश्यक ते सर्व प्रकारचे सहकार्य करून तेथील देखभाल-दुरुस्ती करून देणार आहेत व त्यासाठी कोणताही अडथळा निर्माण करणार नाहीत. आणि,

N. ज्याअर्थी, लिहून देणार यांनी सोसायटी मेंटेनन्स व पायाभूत सुविधांकरिता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्या कार्यालयात कॉर्पस फंडची रक्कम जमा केलेली आहे. आणि,

O. ज्याअर्थी, लिहून देणार अथवा विकसनकर्ता यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम, १९७१ व प्रचलित नियमावलीच्या तरतुदींनुसार सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवली असून, त्या अनुषंगाने सर्व पात्र झोपडीधारकांना मिळणाऱ्या सदनिका व सदनिकेचा मजला पात्र झोपडीधारकांनी आपापसात समजुतीच्या पद्धतीने निवडण्यात आलेला आहे व त्यासाठी दि. ----------- रोजी माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्याकडून मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर सोडतीबाबत लिहून घेणार व त्यांचे कुटुंबीय यांचा कोणताही व कसलाही वाद, फिर्याद व आक्षेप नाही व भविष्यातही राहणार नाही. तसेच याबाबत लिहून देणार हे विकसक व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांस कोणत्याही व कसल्याही प्रकारे तोषिस लागू देणार नाहीत. आणि,

P. ज्याअर्थी, लिहून घेणार हे सदरील झोपडपट्टीमध्ये त्यांच्या कुटुंबियांसह सन २०११ साला पूर्वीपासूनच वास्तव्य करीत होते. त्यानुसार लिहून घेणार यांच्या पात्रतेबाबतचे सर्व पुरावे लिहून घेणार यांनी स्वत: मा. सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचे कार्यालयास सादर केलेले असून सदर लिहून घेणार यांनी सादर केलेल्या त्यांच्याकडील सर्व पुराव्यांचा विचार करून सक्षम प्राधिकारी यांचे तर्फे झालेल्या सर्वेक्षणात लिहून घेणार

यांच्या नावाची नोंद अंतिम पात्रता यादी म्हणजेच परिशिष्ट - २ मध्ये सशुल्क पात्र झोपडीधारक म्हणून समाविष्ट करण्यात आलेले आहे. सबब, सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या योजनेमधील पुनर्वसन ----- इमारतीमधील निवासी सदनिका लिहून घेणार यांचे नावे निश्चित करण्यात आलेली असून, सदर सदनिकेचा करार लिहुन व नोंदवून घेण्याचा तसेच सदर सदनिकेचा ताबा घेण्याचा लिहून घेणार यांना कायदेशीर हक्क व अधिकार प्राप्त झालेला आहे. आणि,

Q. ज्याअर्थी, लिहून घेणार यांनी सदरची मिळकत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत विकसित करणेकामी लिहून देणार यांचे लाभात संमती पत्र लिहून दिले होते व जुन्या झोपडीचा ताबा लिहून घेणार यांनी यापूर्वीच दिला आहे. जुन्या झोपडीचा ताबा घेताना लिहून घेणार यांनी झोपडीमधील सर्व वस्तु, सामान, कागदपत्र इत्यादी त्यांचे ताब्यात घेतलेली होती व त्याबाबत लिहून घेणार यांचा लिहून देणार यांचेविरुद्ध कोणताही व कसल्याही प्रकारचा वाद, विवाद, तक्रार, फिर्याद नव्हता, नाही व भविष्यातही राहणार नाही. आणि,

R. ज्याअर्थी, सक्षम अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र यांच्याकडील झोपडपट्टी निर्मूलन आदेशानुसार विकसनकर्ता यांनी झोपडीधारकांची बांधकामाच्या काळात पर्यायी जागेची व्यवस्था करून दिलेली होती व त्यानुसार लिहून घेणार यांना राहण्याकरता योग्य सोय उपलब्ध केलेली होती. सदर व्यवस्था संपुष्टात आली असून लिहून घेणार यांचा त्याबाबत कोणताही हक्क हितसंबंध शिल्लक राहिलेला नाही. तसेच काही झोपडीधारकांनी स्वतःच्या राहण्याची सोय स्वत: केली होती व त्यांचे वेळोवेळीचे भाडे रक्कम लिहून घेणार यांना लिहून देणार यांचेकडून प्राप्त झालेली आहे व याबाबत कुठलीही व कसलीही तक्रार नाही अथवा थकबाकी इत्यादी काही नाही हे लिहून घेणार या दस्तऐवजाने मान्य व कबूल करीत आहेत. आणि,

S. ज्याअर्थी, लिहून देणार विकसनकर्ता यांनी सदरील घोषित झोपडपट्टीतील पात्र झोपडीधारकांना कायमस्वरूपी मालकी हक्क तत्वावर देय असलेल्या सशुल्क द्यावयाच्या सदनिकेचे इमारतीचे बांधकाम पूर्ण केलेले असून, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेकडून सदर इमारतीचे संदर्भात अंशतः भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त केलेले आहे. आणि,

T. ज्याअर्थी, विकसकाने सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता केली असल्याने, सदरील सदनिकांमध्ये लिहून घेणार यांचे वास्तव्यासाठी स्थलांतर करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेमार्फत विकसकास परवानगी मिळाली आहे. तसेच सदर निवासी सदनिकांमध्ये स्थलांतर करण्याचे व संक्रमण शिबिरातील दिलेल्या तात्पुरत्या गाळा याचा प्रत्यक्ष ताबा विकसनकर्ता यांना रिक्त करून देण्याचे लिहून घेणार यांनी मान्य व कबूल केले आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेकडील विशेष नियमावली, २०१४ मधील नियम क्र. एस. आर. ७(२) नुसार लिहून देणार, विकसक यांनी सदर योजनेतील

पात्र लाभार्थींच्या कुटुंब प्रमुख व पति/पत्नी यांचे नावे असल्यास सामाईकात सदनिकेचा करारनामा लिहून व नोंदवून देणे अनिवार्य असल्याने नवीन सदनिकेचा प्रस्तुतचा करारनामा हा उभय पक्षांमध्ये आज लिहून व नोंदवून ठेवण्यात येत आहे.

**विकसनकर्ता व लिहून घेणार यांच्यामध्ये पुनर्वसन ईमारतीमधील नवीन सदनिकेच्या संदर्भात खालीलप्रमाणे करारनामा करण्यात येत आहे :-**

१) परिशिष्ट " **अ**" मध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवणेकामी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे लिहून देणार यांनी बांधकाम पूर्ण केलेले असून, लिहून घेणार हे पात्र झोपडीधारक म्हणून परिशिष्ट " **ब** "मध्ये नमूद केलेला निवासी गाळा अथवा सदनिका शासनाच्या धोरणाप्रमाणे प्राप्त करण्यास पात्र आहेत.

२) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी मंजूर केलेल्या योजनप्रमाणे लिहून घेणार यांना पात्र झोपडीधारक म्हणून प्राप्त झालेले मूळ झोपडीसंदर्भातील सर्व हक्क व अधिकार कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, ताबा, वहिवाट इत्यादी राखून न ठेवता प्रस्तुतच्या करारनाम्यान्वये सोडून दिलेले असून, ते पूर्णपणे संपुष्टात आलेले आहेत. सबब, शासनाच्या धोरणाप्रमाणे सदर हक्कांच्या मोबदल्यापोटी लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना **परिशिष्ट - ब** यात वर्णन केलेली सदनिका मिळकत ही मालकी हक्क तत्वावर सशुल्क दिली असून, सदर सदनिकेचा खुला व प्रत्यक्ष ताबा हा लिहून घेणार यांनी लिहून देणार यांच्याकडून या करारनाम्यान्वये स्विकारलेला आहे. तसेच लिहून घेणार हे असे घोषित करतात की, **परिशिष्ट -ब** मध्ये वर्णन केलेली सदनिका मिळकतीच्या मोबदल्यापोटी लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना कोणत्याही प्रकारची रोख रक्कम अथवा इतर कोणत्याही स्वरूपात मोबदला मागितलेला नसून, सदरची सदनिका मिळकत ही लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत शासनाच्या धोरणानुसार सशुल्क दिली असून त्याकामी लिहून घेणार यांनी शासनाच्या निर्णयाप्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्याकडे रक्कम रुपये २,५०,०००/- इतक्या रकमेचा भरणा चलन क्र. .......... द्वारे केलेला आहे.

३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्याकडील नियमानुसार परिशिष्ट - "अ" व परिशिष्ट - "**ब**" मध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीवरील इमारत व सदनिका मिळकत यासंदर्भातील बांधकामाचा दर्जा, स्वरूप, क्षेत्र, इत्यादी., तसेच देण्यात आलेल्या सर्व आनुषंगीक सोयीसुविधा या योग्य, बरोबर, दर्जेदार तसेच उत्कृष्ट आहेत

व याची खात्री लिहून घेणार यांनी करून घेतलेली असून याबाबत लिहून घेणार यांची कोणतीही तक्रार फिर्याद, वाद इत्यादी नाही.

४) परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केलेली सदनिका ही लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना शासनाच्या धोरणानुसार सशुल्क दिलेली असून सदरची सदनिका लिहून देणार यांनी मंजूर नकाशाप्रमाणे बांधून सदनिकेसाठी पाणी, ड्रेनेज, विजेची जोडणी, इत्यादी सुविधा झोपुप्राच्या नियमाप्रमाणे पुरवलेले आहेत. लिहून देणार यांनी या सर्व बाबींची पूर्णपणे तपासणी व खात्री करून घेतलेली असून, लिहून देणार यांची लिहून घेणार यांचे विरुद्ध कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत वाद नाही.

५) सोबत परिशिष्ट - अ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीवर सर्व पात्र सदनिकाधारकांनी/ गाळेधारकांनी "--------------------------" या नावे संस्था स्थापन केली असून त्याबाबत सहायक निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे नोंदणी केली असून त्यांचेकडून प्रमाणपत्र ----------------- अन्वये दि. -------------- रोजी प्राप्त केलेले आहे. सबब सदरच्या गृहनिर्माण संस्थेशी संबंधित अंगीकृत केलेले सर्व अटी, शर्ती, नियम इत्यादी हे लिहून घेणार यांच्यावर बंधनकारक राहणार आहेत, याबाबतची संपूर्ण जाणीव व कल्पना ही लिहून घेणार यांस लिहून देणार यांनी दिलेली असून, ती लिहून घेणार यांस मान्य व कबूल आहे. त्याचप्रमाणे सदरची संस्था भविष्यात वेळोवेळी जे जे अटी, शर्ती, नियम इत्यादी अंगीकृत करेल, त्या सर्व गोष्टींचे लिहून घेणार व त्यांच्या कुटुंबीयांनी पालन करण्याची हमी व खात्री लिहून घेणार यांनी या दस्ताद्वारे दिलेली आहे.

६) लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना देऊ केलेल्या सशुल्क सदनिकेबाबत अथवा पुनर्वसन योजनेबाबत लिहून घेणार अथवा त्यांचे कोणतेही व कोणीही भाऊबंद, भाऊ, सावकार, वालीवारस, इतर हक्क सांगणार नाहीत व त्यांनी कोणत्याही प्रकारची हिल्ला, हरकत इत्यादी केल्यास अथवा सदर सदनिकेवर कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार सांगितल्यास, त्याचे सर्वतोपरी निवारण हे लिहून घेणार यांनी स्वखर्चाने करून घ्यायचे आहे व त्याची जबाबदारी ही लिहून घेणार यांचीच राहणार आहे, तसेच अशा प्रकरणी लिहून घेणार हे लिहून देणार अथवा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांना कोणत्याही व कसल्याप्रकारे तोषिस लागू देणार नाहीत.

७) परिशिष्ट - ब मध्ये वर्णन केलेली सदनिका ही लिहून घेणार यांस झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत मालकी हक्क तत्वावर देण्यात आली असून सदरची सदनिका मिळकत ही लिहून घेणार यांस ताब्यात दिल्यापासून १० (दहा) वर्षाच्या आत इतर कोणत्याही इसमास अथवा संस्थेस कोणत्याही प्रकारे म्हणजेच विक्री, बक्षीस, भाडेपट्टा, तारण, विकसन, आदलाबदली, लायसन्स, गहाण, संयुक्त उद्यमकरार, लिज, असाईन,

इत्यादी अथवा अन्य स्वरूपात तबदील/हस्तांतरित करायची नाही, व तसे केल्यास लिहून घेणार हे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे यांच्या कारवाईस पात्र राहतील व सदरचा करारनामा एकतर्फा रद्द करण्याचा तसेच सदर सदनिकेचा ताबा परत घेण्याचा सर्वस्वी हक्क व अधिकार हा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांना कायद्यान्वये राहिल. सदर कारवाईस अथवा नुकसान भरपाईस इत्यादीस लिहून घेणार हेच सर्वस्वी जबाबदार राहणार आहेत, ही बाब लिहून घेणार यांनी मान्य व कबूल केलेली आहे. या संदर्भात राज्य शासनाचे नियमांचे पालन करणे अनिवार्य असेल.

८) सदर सदनिका ही झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियमानुसार बांधण्यात आलेली असून, सदर सदनिकेमध्ये लिहून घेणार यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्या पूर्व लेखी परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारचा बदल करावयाचा नाही. तसेच सदर इमारतीस अथवा इमारतीच्या कोणत्याही भागास धोका निर्माण होईल असे कोणत्याही प्रकारचे कृत्य लिहून घेणार यांनी करावयाचे नाही. लिहून घेणार यांनी पुनर्वसन इमारतीच्या टेरेस, पार्किंग, मोकळ्या जागेवर, इत्यादी कोणत्याही ठिकाणी अनधिकृत व बेकायदेशीर बांधकाम करावयाचे नाही अथवा झोपडी बांधावयाची नाही. कोणतेही अनधिकृत कृत्य केल्याचे आढळल्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे लिहून घेणार यांचे विरुद्ध झोपडपट्टी अधिनियम तसेच राज्य शासनाचे धोरणानुसार योग्य ती कारवाई करणार आहेत व असे बेकायदेशीर बांधकाम पाडण्याचा संपूर्ण अधिकार हा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यास राहील याची पूर्ण कल्पना लिहून घेणार यांना या दस्तान्वये देण्यात आलेली आहे व अशा प्रकरणी होणाऱ्या सर्व कारवाईसाठी लिहून घेणार हेच सर्वस्वी जबाबदार असणार आहेत.

९) लिहून घेणार यांनी सदरच्या सदनिकेचा वापर हा स्वतःच्या निवासाकरीता करावयाचा असून, सदर सदनिकेचा बिगरनिवासी अथवा इतर कारणासाठी वापर करावयाचे नाही याची कल्पना लिहून घेणार यांस दिलेली असून ती त्यांनी समजून घेतलेली आहे, व त्याचे पालन करण्याची हमी दिली आहे.

१०) सदर सदनिका व इमारत, तसेच आजूबाजूचा परिसर हा लिहून घेणार यांनी सुस्थितीत ठेवण्याचा आहे. सदनिका व इमारतीमधील सर्व वैयक्तिक व सामायिक सुविधा, उदाहरणार्थ, इलेक्ट्रिक/इलेक्ट्रॉनिक फिटिंग, दरवाजे, खिडक्या, फरश्या, रंगकाम, नळ, सिंक, जिने, पार्किंग, इमारतीचे आजूबाजूची मोकळी जागा, पॅसेज, पाण्याच्या टाक्या, इत्यादी ठिकाणी तसेच या दस्तासोबत जोडलेल्या स्पेसिफिकेशनमध्ये नमूद केलेल्या सर्व सुविधा या लिहून घेणार यांनी प्रस्तुतच्या दस्तावर सह्या करणेपूर्वी तपासून घेतलेल्या असून, त्या सर्व लिहून देणार यांनी आश्वासित केल्याप्रमाणे सुस्थितीत व

बरोबर चालू असल्याबाबतची खात्री लिहून घेणार यांनी वैयक्तिकरित्या करून घेतलेली आहे, व त्यांच्या दर्जाविषयी कुठलीही व कसलीही तक्रार अथवा वाद नाही.

११) लिहून घेणार यांनी सदरील सदनिका वेळोवेळी नीटनेटकी, राहण्यायोग्य व सुस्थितीत ठेवण्याची आहे. तसेच लिहून घेणार यांनी सदर सदनिकामध्ये कोणत्याही प्रकारचे स्फोटके, ज्वालाग्राही पदार्थ इत्यादींचा साठा करायचा नाही, तसेच सदर इमारतीस व इतर सदनिकाधारकांस हानी पोहोचेल असे कोणत्याही प्रकारचे कृत्य करावयाचे नाही, आणि सदर सदनिका अथवा गाळ्यांच्या अंतर्गत भागात कोणत्याही स्वरूपाचे नुकसान होईल, असे कृत्य करायचे नाही. उदाहरणार्थ - कॉलम अथवा बिमला खिळे ठोकणे, तोडणे, कटिंग करणे, भिंत पाडणे, दरवाजे अथवा खिडक्या काढून टाकणे, बदल करणे, इत्यादी अशा कोणत्याही प्रकारचे बेकायदेशीर कृत्य केल्यास इमारतीस अथवा आजूबाजूच्या रहिवाशांचे काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई देण्याची सर्वस्वी जबाबदारी ही लिहून घेणार यांच्यावरच राहील, तसेच अशा प्रकरणी आवश्यकतेप्रमाणे सुरू होणाऱ्या दिवाणी व फौजदारी कारवाईससुद्धा लिहून घेणार हेच जबाबदार राहतील.

१२) सदर इमारत मिळकतीमध्ये असलेले जिने, सामायिक जागा, मोकळ्या जागा, सदनिकाधारकांना जाण्याकरता असलेल्या रस्त्या/जागेमध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करावयाचा नाही. त्याचप्रमाणे सदनिका, बाल्कनी, टेरेस, पॅसेज इत्यादीमधून केरकचरा/कोणत्याही प्रकारच्या वस्तू इत्यादी टाकायच्या नाहीत व इतर सदनिकाधारकांना त्रास होईल, असे कोणतेही वर्तन करावयाचे नाही. तसेच लिहून घेणार यांनी सदर इमारतीचे एलेवेशन खराब होईल असे कोणते प्रकारचे कृत्य करावयाचे नाही उदाहरणार्थ- लोखंडी ग्रील/दार बसवणे, दारे/खिडक्यांच्या फ्रेममध्ये बदल करणे/ काढणे इत्यादी प्रकारचे कोणतेही कृत्य करावयाचे नाही व लिहून घेणार यांनी इमारतीच्या बांधकामाबाबत/देखभाल-दुरुस्तीबाबत कोणताही कायदेशीर अडथळा निर्माण करावयाचा नाही. <u>महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत अनुज्ञेय वापर करावा व त्याबाबत कोणताही भंग होणार नाही याची खात्री</u> करावी.

१३) सदर परिशिष्ट - ब मध्ये वर्णन केलेली सदनिका मिळकत ही कायमस्वरूपी मालकी हक्काने सशुल्क देण्यात आलेली असून प्रस्तुतचा करार हा महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६१ व महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट ऍक्टच्या तसेच त्या अंतर्गत विविध नियमावली व तरतुदींच्या तरतुदीस पात्र राहील, व भविष्यात सदर अधिनियम व नियम यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलास पात्र राहणार आहे.

१४)सदरची सदनिका ही लिहून घेणार यांना ताब्यात मिळाल्यापासून महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास), अधिनियम, १९७१ च्या कलम ३(ई) च्या तरतुदींप्रमाणे पुढील १० (दहा) वर्षाच्या स्वतःच्या निवासी वापराकरता न वापरता इतर व्यक्ती अथवा संस्थेस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय विक्री, बक्षीस, भाडेपट्टा, गहाण, तारण, विकसन, लीव्ह अँड लायसन्स ,अदलाबदल, कुलमुखत्यार, इत्यादी अथवा अन्य कोणत्याही स्वरुपात तबदील अथवा हस्तांतरित केल्याचे निदर्शनास आल्यास सदरची सदनिका ही मा. मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे यांना त्यांचे ताब्यात घेण्याचे सर्वस्वी हक्क व अधिकार असल्याचे, संपूर्ण जाणीव व कल्पना लिहून घेणार यांना या दस्ताद्वारे देण्यात आलेले आहे. तसेच सदरचा करारनामा एकतर्फा रद्द करण्याचासुद्धा सर्वस्वी हक्क व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांना आहे व ही बाब लिहून घेणार यांनी समजून उमजून घेतलेली आहे. तसेच सदरचे दहा वर्ष संपल्यानंतर सुद्धा सदरची सदनिका झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय इतर कोणासही हस्तांतरित/तबदील इत्यादी कोणत्याहीप्रकारे व्यवहार करता येणार नाही.

१५) लिहून घेणार हे या दस्तान्वये घोषित करत आहेत की, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये लिहून घेणार यांची कोणतीही झोपडी अस्तित्वात नाही व भविष्यातसुद्धा लिहून घेणार हे कोणत्याही झोपडपट्टीमध्ये रहावयास जाणार नाहीत, हे लिहून घेणार यांनी प्रस्तुतच्या दस्तान्वये मान्य व कबूल केले आहे. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाअंतर्गत लिहून घेणार यांना परिशिष्ट "ब" यात वर्णन केलेली सदनिका मिळाल्यानंतर, लिहून घेणार अथवा त्यांचे कुटुंबियातील इतर सदस्य भविष्यात कधीही दुसऱ्या कोणत्याही झोपडीच्या मोबदल्यात मालकी हक्काने नवीन सदनिकेची मागणी करणार नाही, याची हमी व खात्री लिहून घेणार यांनी या दस्तान्वये लिहून देणार यांनी दिलेली आहे.

१६) परिशिष्ट "अ" मध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीवर बांधण्यात आलेल्या इमारतीमधील व इमारतीच्या परिसरामधील रहिवाशांचे व स्वतःचे आरोग्य व स्वच्छतेची जबाबदारी ही लिहून घेणार व इतर सदनिकाधारक यांच्यात सामायिक राहील. त्याकामी लिहून घेणार व त्यांच्या कुटुंबीयांमुळे सदर इमारतीतील इतर सदनिकाधारकांना अथवा गाळेधारकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची संपूर्ण दक्षता घेण्याची आहे. त्याचप्रमाणे लिहून घेणार यांनी सदर इमारतीमधील मोकळ्या जागा, रिफ्युज एरिया, पार्किंग, टेरेस, पॅसेज इत्यादी कोणत्याही ठिकाणी वस्तू व सामान ठेवून अथवा कुठल्याही प्रकारचा अडथळा निर्माण करून इतर गाळेधारकांना

त्रास होईल असे कृत्य करायचे नाही. तसेच पुनर्वसन प्रकल्पातील इमारतीमधील सामायिक जागांमध्ये कोणत्याही प्रकारचा सामान वस्तू सायकली, वाहने किंवा अडगळीच्या वस्तू ठेवून इतर रहिवाशांचे वहिवाटीस कोणत्याही व कसल्या प्रकारचा अडथळा निर्माण करावयाचा नाही.

१७) मुक्त विक्री घटकातील सदनिका अथवा दुकानदार यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षतासुद्धा लिहून घेणार व त्यांच्या कुटुंबीयांनी घेण्याची आहे. तसेच मुक्त विक्री घटकातील इमारतीच्या मोकळ्या जागा, रिफ्युज एरिया, पार्किंग, टेरेस, पॅसेज, पाण्याच्या टाक्या, इत्यादी ठिकाणी सुद्धा लिहून घेणार व त्यांच्या कुटुंबीयांनी अडथळा निर्माण करायचा नाही व कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण करावयाचे नाही.

१८) झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात नवीन सदनिकांमध्ये रहावयास गेल्यानंतर तेथील आरोग्य, स्वच्छता व साफसफाईची जबाबदारीही लिहून घेणार यांचेवर संस्थेचे सभासद म्हणून राहणार आहे.

१९) सदर स्थापित झालेल्या सहकारी संस्थेचे मासिक देखभाल शुल्क खर्चाची, मासिक वीजबिल, पाणीपट्टी, सरकारी कर, पट्टे इत्यादी हे लिहून घेणार यांनी त्यांच्या हिस्स्यानुसार सहकारी गृहनिर्माण संस्थेस देण्याची जबाबदारी लिहून घेणार यांच्यावर राहील व लिहून घेणार यांना प्राप्त झालेल्या सदनिकेसंदर्भात सर्व देखभाल, दुरुस्ती, मासिक खर्च, विजबिल, पाणीपट्टी, कर- पट्ट्या, सर्व शासकीय कर इत्यादी देण्याची जबाबदारी ही लिहून घेणार यांच्यावर राहील.

२०) सदर पुनर्वसन प्रकल्पात बांधलेल्या इमारतीमधील उद्वाहन (लिफ्ट) चा वापर लिहून घेणार व त्यांच्या कुटुंबीयांनी आवश्यकतेनुसार करावयाचा आहे व सामाईकात येणारे वीज बिल हे लिहून घेणार यांनी त्यांच्या हिस्स्याप्रमाणे त्वरित सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे वेळोवेळी जमा करायचे आहे.

२१) सदरील कराराच्या अनुषंगाने येणारा सर्व खर्च नोंदणी शुल्क, मुद्रांक शुल्क, वकील शुल्क, इतर सर्व खर्च तसेच एम.एस.डी.सी.एल मीटर, ट्रान्सफॉर्मर्स, उद्वाहन, अनामत रक्कम इत्यादी सर्व खर्च हा लिहून देणार विकसक यांनीच केलेला आहे. तसेच भविष्यात ज्यादा मुद्रांक शुल्क द्यावे लागल्यास सदर ज्यादा मुद्रांक शुल्काची तोशिष विकसक प्राधिकरणास लागू देणार नाही.

२२) लिहून घेणार यांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या जुन्या झोपडीचा खुला व प्रत्यक्ष ताबा यापूर्वीच दिलेला असून लिहून घेणार हे या दस्ताद्वारे घोषित करतात की परिशिष्ट - अ मधील नमूद जमीन मिळकतीवर असलेले झोपडीधारक म्हणून लिहून घेणार यांचे सर्व हक्क अधिकार हे या दस्ताद्वारे संपुष्टात आलेले आहेत व सदरचे हक्क व अधिकार हे परिशिष्ट ब मध्ये वर्णन केलेल्या सदनिकेच्या मोबदल्यात कायमस्वरूपी सोडून दिलेले

आहेत. लिहून घेणार व त्यांच्या कुटुंबीयांची याबाबत कोणतीही व कसलीही तक्रार नव्हती, नाही व भविष्यातही असणार नाही.

२३) लिहून घेणार यांनी पूर्वी त्यांच्या ताब्यात असलेल्या झोपडीचे सर्व कर, पाणीपट्टी, सेवा शुल्क इत्यादी भरले असून, सदर प्रकरणी सर्व कर, पाणीपट्टी, सेवा शुल्क इत्यादी संदर्भात जी काही थकबाकी निघेल ती भरण्याची जबाबदारी लिहून घेणार यांचीच राहणार आहे व सदरची थकबाकी लिहून देणार यांनी भरली असल्यास, सदरची रक्कम ही लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदरच्या सदनिकेचा ताबा घेण्यापूर्वी द्यायची आहे व अशी बाब लिहून घेणार यांच्यावर बंधनकारक आहे.

२४) लिहून घेणार व त्यांचे कुटुंबीय हे सदनिका तसेच हे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत (एस.आर.ए) बांधलेल्या इमारतीच्या ब्लॉकबाबत / पुनर्वसन ---- इमारतीबाबत संपूर्णतः समाधानी आहेत, व लिहून घेणार हे यापुढे विकसक अथवा लिहून देणार यांचेविरुद्ध कोणतीही तक्रार, वाद, दावा फिर्याद इत्यादी काही उपस्थित करणार नाहीत.

२५) सदर लिहून घेणार हे या दस्तामधील सर्व अटी व शर्ती यांना बांधील आहेत व लिहून घेणार हे विकसक अथवा सदरील एसआरए योजने बाबतीत व त्याच्याविरुद्ध कोणतेही व कसलीही तक्रार, फिर्याद, वाद, इत्यादी कोणतेही अधिकारी अथवा न्यायालय अथवा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण/ न्यायाधीकरण इत्यादींकडे उपस्थित करणार नाहीत.

२६) लिहून घेणार याद्वारे मान्य व कबूल करतात की, सदर सदनिकांच्या सर्व सुविधा तसेच सामायिकातील सर्व सुविधा यांचा दर्जा हा सर्वोत्तम असून, ईमारत व सुविधा नवीन, चांगल्या व सर्व सूस्थितीत आहेत, तसेच त्यांचा प्रत्यक्ष ताबा घेतलेला आहे व याबाबत लिहून घेणार यांची विकसक यांचे विरुद्ध कोणतीही तक्रार, वाद, दावा फिर्याद इत्यादी काही एक नाही व भविष्यातही करणार नाहीत.

२७) गृहनिर्माण विभाग, मंत्रालय यांचे आदेश क्रमांक. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.५४(भाग१)/ झोपसु-१, दिनांक १४/०८/२०२३ रोजीच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत सशुल्क पुनर्वसन सदनिकांच्या वितरणाबाबत मार्गदर्शक सूचना करण्यात आलेल्या असून सदर शासन निर्णयामधील सर्व सूचना लिहून घेणार यांच्यावर बंधनकारक राहतील.

२८) सदर प्रकरणी परिशिष्ट 'अ' मधील मिळकतीसंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या धोरणाप्रमाणे झोपडीधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेसोबत प्रथम ३० वर्षाचा भाडेपट्टा करण्यात येईल व तो नोंदणीकृत करण्यात येईल. तसेच भविष्यात ज्यादा मुद्रांक शुल्क द्यावे लागल्यास सदर ज्यादा मुद्रांक शुल्काची तोशिष विकसक प्राधिकरणास लागू देणार नाही.

२९) शासन, प्राधिकरण तसेच सर्व सांविधानिक प्राधिकाऱ्यांकडील सर्व आदेश, निर्देश व सुचना सर्व संबंधितांवर बंधनकारक राहतील. लिहून देणार यांनी प्रस्तुतचा करारनामा

433

दुय्यम निबंधक यांच्याकडे नोंदणी होणे कामी असलेला आवश्यक तो सर्व खर्च केलेला आहे.

परिशिष्ट - अ

**जमीन मिळकतीचे वर्णन** - तुकडी ----, पोट तुकडी, तालुका - -----, मे. दुय्यम निबंधक सो ------, पुणे यांचे कार्यक्षेत्रातील व --------------------- हद्दीतील मौजे गाव ------- येथील ---------------- यांसी एकूण क्षेत्रफळ ------------ चौरस मीटर चतु:सिमापुर्वक वर्णन खालीलप्रमाणे:-

पूर्वेस - -------------------

पश्चिमेस - -------------------

दक्षिणेस - -------------------.

उत्तरेस - -------------------

## परिशिष्ट - ब

**सदनिकेचे वर्णन** - वर परिशिष्ट अ यात वर्णन केलेली जमीन मिळकत यांसी -------- चौ.मी पैकी ------ चौरस मीटर इतक्या क्षेत्रावर बांधण्यात आलेल्या पुनर्वसन --- इमारत व --------------------- या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील __________ मजल्यावरील सदनिका क्रमांक __________ यासी क्षेत्रफळ २७.८७ चौरस मीटर म्हणजेच ३०० चौरस फूट ही सदनिका मिळकत प्रस्तुतच्या करारनाम्याचा विषय आहे.

प्रस्तुतच्या करारातील नमूद सर्व अटी व शर्ती या मुख्य अटी व शर्ती असून, या सर्व अटी व शर्ती लिहून घेणार यांनी मान्य व कबूल केलेले आहेत व या सर्व अटी व शर्तींचे पालन करण्याची हमी, ग्वाही व खात्री ही लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना दिलेली आहे. तसेच प्रस्तुतचा करार हा लिहून घेणार व लिहून देणार यांच्यावर, त्यांचे वालीवारस इत्यादींवर बंधनकारक राहील. सदर करारनाम्यातील सर्व अटी व शर्ती लिहून देणार व लिहून घेणार यांनी त्यांच्या राजीखुशीने स्वसंतोषाने अक्कलहुशारीने समजून-उमजून वाचून घेऊन तसेच कोणत्याही प्रकारचा नशापाणी न करता व दबावाच्या बळी न पडता -------- मुक्कामी या करारनाम्यावर सही व अंगठा केलेले असून, मे. दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदवून दिला आहे.

| |
|---|
| १) श्री. |

| फोटो | सही | अंगठा |
| --- | --- | --- |
| | | |

२) सौ.

| फोटो | सही | अंगठा |
| --- | --- | --- |
| | | |
| लिहून देणार | | |

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेकडील नोंदणीकृत विकसक ----------------------------- तर्फे भागीदार/अधिकृत स्वाक्षरी कर्ता - ----------------------------

| फोटो | सही | अंगठा |
| --- | --- | --- |
| | | |

| | | |
|---|---|---|
| | | |
| लिहून देणार | | |

| | |
|---|---|
| साक्षीदार :- | |
| १. नाव :-<br>पत्ता :-<br>सही :- | १. नाव :-<br>पत्ता :-<br>सही :- |